# फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ची सुधारणा कलम



**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ची सुधारणा कलम २६ ची सुधारणा यात खंड (अ) च्या परंतुकामध्ये भारतीय दंडसंहितेच्या कलम ३७६ व कलम ३७६-अ ते कलम ३७६-ड खालील अपराध या मजकुरा ऐवजी भारतीय दंडसंहितेच्या कलम ३७६,३७६-अ,३७६-ब,३७६-क,३७६-ड किंवा कलम ३७६-इ खालील अपराध हा मजकूर दाखल करण्यात येईल.**

**कलम ५४-अ ची सुधारणा :** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५४-अ मध्ये पुढी परंतु समाविष्ट करण्यात येईल.

जर अटक झालेल्या अपराध्यास ओळखणारी व्यक्ती मानसिक, शारीरिक दृष्ट्या असमर्थ असेल तर ओळख पटविण्याची प्रक्रिया न्यायदंडाधिकाऱ्याच्या देखरेखी खाली होईल. या व्यक्तीकडून सोयीस्कर पद्धतीने ओळख पटविण्याचे कार्य करण्यात येईल.

पण जर ही ओळख पटवणारी व्यक्ती मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या विकलांग असेल तर ही प्रक्रिया व्हिडिओग्राफद्वारे करण्यात यावी.

**कलम १५४ ची सुधारणा:-** ज्या अपराध्याविरुद्ध भारतीय दंडसंहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३२६-अ, कलम ३२६-ब, कलम ३५४, कलम ३५४-अ, ३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड,३७६-इ किंवा कलम ५०९ खाली अपराध केला असेल किंवा करण्याचा प्रयत्न केला असेल असा अभिकथन करणाऱ्या महिलेचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे नोंदविण्यात येईल.

**परंतु आणखी असे की,**

अ) ज्या कोणा व्यक्तीविरुद्ध भारतीय दंडसंहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३५४, ३५४-अ,३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड,३७६-इ किंवा कलम ५०९ च्या अंतर्गत अपराध केला असल्याचे अभिकथन केले असेल. अशी व्यक्ती जर तात्पुरती वा कायमची मानसिक वा शारीरिक दृष्ट्या विकलांग असेल तर त्या व्यक्तीच्या घरी, त्याच्या पसंतीच्या ठिकाणी, दुभाषी किंवा विशेष शिक्षकाच्या उपस्थितीत पोलीस अधिकाऱ्याद्वारे जबाब नोंदविण्यात येईल.ब)अशा माहितीची नोंदणी व्हिडिओग्राफिक करण्यात यावी.

क) पोलीस अधिकारी, कलम १६४ च्या पोटकलम (५अ) च्या खंड (अ) अन्वये न्याय दंडधिकाऱ्याने नोंदविलेला या व्यक्तीचा जबाब शक्य तितक्या लवकर मिळवावा.

**कलम १६० ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६० मधील, पोट कलम(१) मधील, परंतु पंधरा वर्षे वयाखाली पुरुष व्यक्तीला किंवा महिलेला या मजकुराऐवजी पंधरा वर्षे वयाखालील किंवा पासष्ट वर्षे वयावरील कोणत्याही महिलेला किंवा शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या विकलांग असलेल्या व्यक्तीला हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**कलम १६१ ची सुधारणा :-** भारतीय दंड फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ मध्ये, पोटकलम (३) मधील परंतुकामध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल.

ज्या महिलेच्या विरुद्ध भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३५४, ३५४-अ,३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड,३७६-इ किंवा कलम ५०९ अपराध केला असल्याचे आभिकथन केले आहे. अशा महिलेचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे किंवा कोणत्याही महिला अधिकाऱ्याद्वारे नोंदविण्यात येईल.

**कलम १६४ ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५४, ३५४-अ,३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड,३७६-इ किंवा कलम ५०९ खालील शिक्षापात्र

असलेल्या प्रकरणी न्याय दंडाधिकारी, ज्या व्यक्तीविरुद्ध असा अपराध करण्यात आला आहे त्या व्यक्तीचा जबाब, अपराध घडल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आल्याबरोबर, पोटकलम(५) मध्ये विहित केलेल्या रीतीने नोंदविल.

जर जबाब देणारी व्यक्ती तात्पुरती वा कायमस्वरूपी विकलांग असेल तर दंडाधिकारी जबाब नोंदवितांना दुभाषी किंवा विशेष शिक्षकाचे साहाय्य घेईल. वरील प्रमाणे जबाब घेता आला नाही तर व्हिडिओग्राफित जबाब घेता येईल.

किंवा अशा व्यक्तीचा खंड (अ) अन्वये नोंदविलेला जबाब भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२चा १०) याच्या कलम १३७ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सरतपासणीऐवजी जबाब असल्याचे विचारात घेण्यात येईल. म्हणजे असे की जबाब देणारी व्यक्ती न्यायचौकशीच्या वेळी जबाब न नोंदविता अशा जबाबावरून उलटतपासणी घेऊ शकते.



**कलम १९७ ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ मधील पोट-कलम(१) नंतर पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल.

**स्पष्टीकरण:-** भारतीय दंडसंहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३५४, ३५४-अ,३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड,३७६-इ किंवा कलम ५०९ खालील कोणताही अभिकथित अपराध केला असल्याचा आरोप असलेल्या लोकसेवकाच्या बाबतीत मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

**१९८-ब अपराधाची दखल घेणे:-** जेंव्हा पतीविरुद्ध पत्नीने केलेल्या तक्रारीत जी तथ्ये अपराध ठरवितात त्यांची खात्री पटल्याशिवाय भारतीय दंडसंहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३७६-ब खालील अपराधाची दखल घेणार नाही.

**कलम २७३ ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ मध्ये स्पष्टी करणापूर्वी पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल.

जी महिला बलत्काराची किंवा अन्य लैंगिक अपराधाची शिकार झाली असल्याचे अभिकथन केले आहे. व ती अठरा वर्षांखालील असेल तर तिचा साक्षी पुरावा नोंदवायचा असेल तर न्यायालय अशा महिलेला आरोपीसमोर आणणार नाही. त्या आरोपीची उलट तपासणी घेण्याच्या हक्काची खात्री करण्याची देखील यथोचित उपाययोजना करू शकेल.

**३५७ क. पीडित व्यक्तींचा उपचार :-** सर्व सार्वजनिक किंवा खासगी रुग्णालये-ती केंद्र, राज्य शासन, स्थानिक संस्था किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे चालविण्यात येत असते. भारतीय संहितेच्या(१८६०चा ४५) कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड , ३७६-इ खाली समाविष्ट असलेल्या कोणत्याही अपराधाच्या पीडित व्यक्तीस तातडीने मोफत प्रथमोपचार किंवा वैद्यकीय उपचार पुरवील.

**कलम ३०९ ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ मधील पोटकलम (१) ऐवजी पुढील पोटकलम दाखल करण्यात येईल.

१) प्रत्येक चौकशी वा न्यायचौकशीत न्यायालयात नोंदवायच्या कारणासाठी दररोजची कार्यवाही पुढच्या दिवसानंतर संस्थागित करणे आवश्यक असल्याचे आढळून आल्याशिवाय, उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची दररोज तपासणी करण्यात येईपर्यंत कार्यवाही नियमितपणे चालविण्यात येईल.

पण जेंव्हा चौकशी वा न्यायचौकशी भारतीय दंड संहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड खालील अपराधाशी संबधीत असेल तेंव्हा उपरोक्त चौकशी शक्यतो दोषारोपपत्र दाखल केल्यापासून दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

**कलम ३२७ ची सुधारणा :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२७ मधील पोटकलम(२) मध्ये किंवा भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा४५) कलम ३७६-ड किंवा कलम ३७६-इ हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**नवीन कलम ३५७-ब व ३५७-क समाविष्ट करणे. :-** कलम ३५७-अ नंतर पुढील कलमे वाचावीत फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७-

अ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील.

कलम ३५७-ब-भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६-अ किंवा कलम ३७६-ड खालील द्रव्य दंडा व्यतिरिक्त नुकसान भरपाई असणे. कलम ३५७-अ च्या अन्वये राज्य शासनाद्वारे प्रदेय असलेली नुकसान भरपाई ही भारतीय दंड संहितेच्या (१८६०चा ४५) याच्या कलम ३२६-अ किंवा कलम ३७६-ड अन्वये पीडित व्यक्तीस द्रव्य दंडाचे प्रदान करण्या व्यतिरिक्त असेल.

**३५७ क. पीडित व्यक्तींचा उपचार:-** सर्व सार्वजनिक किंवा खाजगी रुग्णालये-ती केंद्र, राज्यशासन, स्थानिक संस्था किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे चालविण्यात येत असते. भारतीय संहितेच्या(१८६०चा ४५) कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क,३७६-ड , ३७६-इ खाली समाविष्ट असलेल्या कोणत्याही अपराधाच्या पीडित व्यक्तीस तातडीने मोफत प्रथमोपचार किंवा वैद्यकीय उपचार पुरवील.

**फ) :-** स्तंभ ३ मधील कलम ५०९ शी संबंधित असणाऱ्या नोंदीमध्ये एक वर्षाचा साधा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही याऐवजी ३ वर्षांचा साधा कारावास व द्रव्यदंड हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ याची सुधारणा नवीन कलम ५३-अ समाविष्ट करणे:-** भारतीय दंडसंहितेच्या (१८६०चा४५) कलम ३५४, ३५४-अ, ३५४-ब, ३५४-क, ३५४-ड,३७६, कलम३७६-अ, कलम ३७६-ब, ३७६-क, ३७६-ड किंवा ३७६-इ खालील अपराधाच्या किंवा अपराध करण्याच्या अधियोगामध्ये जेंव्हा संमतीचा प्रश्न निर्माण होईल तेंव्हा पीडित व्यक्तीच्या चारित्र्याचा किंवा अशा व्यक्तीच्या कोणत्याही व्यक्तीबरोबर असलेल्या पूर्व लैंगिक अनुभवांचा साक्षीपुरावा, अशा संमतीच्या किंवा संमतीच्या गुणवत्तेच्या प्रश्नाच्या बाबतीत संबंध असणार नाही.

**कलम ११४-अ ऐवजी नवीन कलम दाखल करणे**

**(मूळ कलम ११४-अ ऐवजी पुढील कलम वाचावे) :-** भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या कलम ११४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल.

११४-अ लैंगिक हमल्याच्या विवक्षित अभियोगामध्ये संमतीचा अभाव असण्या विषयीचे गृहितक -भारतीय दंड संहितेच्या ( १८६० चा ४५) कलम ३७६ च्या पोटकलम (२) च्या खंड (अ), खंड (ब), खंड (क), खंड (ड),खंड (इ),खंड (फ), खंड (ग), खंड (ह),खंड (आय) खंड (ज), खंड (के),खंड (ल), खंड (भ), किंवा खंड (न) खालील बलात्काराच्या अभियोगामध्ये, जेंव्हा आरोपीचे केलेला संभोग सिद्ध झाला असेल आणि बलात्कार करण्यात आला असल्याचे अभिकथन केलेल्या महिलेची संमती होती किंवा कसे असा प्रश्न असेल आणि अशा महिलेने अशा व्यक्तीस संमती दिली नव्हती असे तिच्या साक्षीत न्यायालयासमोर नमूद केले असेल तेंव्हा न्यायालय असे गृहीत धरील की, तिने संमती दिली नव्हती.

**स्पष्टीकरण : -** या कलमातील लैंगिक संभोग याचा अर्थ भारतीय दंड संहितेच्या (१८६०चा ४५) कलम ३७५च्या खंड (अ) ते (क) मध्ये नमूद केलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य असा असेल.

**२७) कलम ११९ ऐवजी नवीन कलम दाखल करणे:-**

(मूळ कलम ११९ ऐवजी पुढील कलम वाचावे)

**११९ तोंडी स्वरूपात संदेश देण्यास-** असमर्थ असलेला साक्षीदार-मुका असलेल्या साक्षीदाराकडून न्यायालयात लेखनाद्वारे किंवा खुणांद्वारे साक्ष घेण्यात येईल अशा प्रकारची साक्ष तोंडी पुरावा मानण्यात येईल.

जर साक्षीदार तोंडी स्वरूपात संदेश देण्यास असमर्थ असेल तर न्यायालय जबाब नोंदवून घेतांना दुभाषीचे किंवा विशेष शिक्षकाचे साहाय्य घेईल आणि अशी जबानी व्हिडिओग्राफिक करण्यात यावी.

**२८) कलम १४६ची सुधारणा:-** कलम ३७६, कलम३७६-अ, कलम ३७६-ब, ३७६-क, ३७६-ड किंवा ३७६-इ खालील अपराधाच्या किंवा असा काणताही अपराध केल्याच्या प्रयत्नाच्या अभियोगामध्ये जेंव्हा संमतीचा प्रश्न उपस्थित होईल तेंव्हा, अशी संमती किंवा संमतीची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी पीडित व्यक्तीच्या सर्वसाधारण अनैतिक चारित्र्यासंबंधी किंवा अशा पीडित व्यक्तीच्या कोणत्याही व्यक्तीबरोबर असलेल्या पूर्वीच्या लैंगिक अनुभवासंबंधीचा पुरावा दाखल करण्यास किंवा पीडित व्यक्तीस उलटतपासणीमध्ये प्रश्न विचारण्यास परवानगी असणार

नाही. (असे साक्षीपुरावा अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये, परंतुकाऐवजी पुढील परंतुका दाखल करण्यात येईल.)

## लैंगिक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण आधिनियम २०१२ ची सुधारणा

**कलम ४२ ऐवजी नवीन कलम दाखल करणे**:- लैंगिक अपराधापासून बालकांचे सरंक्षण आधिनियम २०१२ (२०१२चा ३२) याच्या कलम ४२ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येतील.

**४२ पर्यायी शिक्षा** :- जेंव्हा एखादे कृत्य बिंवाकिंकृत्य या अधिनियमान्वये आणि भारतीय दंडसंहिता (१८६०चा ४५) याच्या कलम १६६-अ कलम ३५४-अ, ३५४-ब, ३५४-क, ३५४-ड, कलम ३७०, ३७०-अ, ३७५,३७६,३७६-अ,३७६-ब,३७६-क, ३७६-ड, ३७६-इ किंवा ५०९ अन्वयेदेखील शिक्षा-पात्र अपराध ठरत असेल तेंव्हा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्या कायद्यामध्ये काहीही



अंतर्भूत असले तरीही, अशा अपराधाचा दोषी असल्याचे आढळून आलेला अपराधी, जी व्यापक प्रमाणात आहे, अशा शिक्षेसाठी तरतूद केल्याप्रमाणे या अधि नियमान्वये किंवा भारतीय दंडसंहितेअन्वये शिक्षेस पात्र असेल.

**४२ हा आधीनियम, अन्य कोणत्याही कायद्याचे अल्पीकरण करणार नाही**:- या आधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदीशिवाय असतील व त्यांचे अल्पीकरण करणार नाही आणि जर कोणतीही विसंगती निर्माण झाली तर, या अधिनियमाच्या तरतुदीचा, बिसंगततेच्या मर्यादेपर्यंत अशा कोणत्याही कायद्याच्या तरतुदींवर अधिभावी परिणाम असेल.